E-35753332

# महाराष्ट्र शासन

संदर्भ क्र. ४६९/२०१८/का.१७,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- ३१ डिसेंबर, २०१८.

प्रति,

उप सचिव,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ३२.

विषय:- महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, कराड, जि. सातारा यांचेकडून प्राप्त निवेदनावरील कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, कराड, जि. सातारा यांचे सोबत जोडलेल्या दि. २८.११.२०१८ रोजीच्या विषयांकित निवेदनाचे कृपया अवलोकन व्हावे.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. १ मार्च, २०१८ अन्वये सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची वयोमर्यादा ४५ वर्षांवरुन वाढवून ५० वर्षे इतकी करण्यात आली आहे. तथापि, ज्या तलाठी कर्मचाऱ्यांची २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत वयाची ४५ वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांना प्रशासनाच्या दिरंगाईमुळे अद्याप सूट देण्यात आली नसल्याने या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे लाभ मिळालेले नाहीत. त्यामुळे दि. १ मार्च, २०१८ पूर्वी ज्या कर्मचाऱ्याने वयाची ४५ वर्षे पूर्ण केलेली आहेत त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याचे सर्व जिल्हाधिकारी यांना आदेश देण्याची महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने सदर पत्रान्वये विनंती केली आहे.

याबाबत कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदी या दि. १ मार्च, २०१८ पासून लागू आहेत. त्यामुळे दि. २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत जर एखाद्या कर्मचाऱ्याच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण झाली असतील व वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची जर परीक्षा नियमामध्ये तरतूद असेल तर परीक्षा नियमांतील इतर सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून त्या कर्मचाऱ्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय ठरते. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना सूचना देण्यासाठी सदर निवेदन आपल्या विभागाकडे हस्तांतरित करण्यात येत आहे.

सोबत- वरीलप्रमाणे

३१/१२/१८
(राजेंद्र वाघ)
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव:-

१. महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, रेव्हीन्यू क्लब, तहसिल कार्यालय शेजारी, कराड, जि. सातारा.

C:\Users\vaishali.bhokare\Desktop\जन २०१८\जन २०१८ पत्र\१७ पत्र.२०१८.docx

Scanned by CamScanner